**प्रसिध्दी पत्रक** दिनांक:-12/11/2020

**1) अमोल हनुमंतराव सुर्यवंशी, वय 34 वर्ष, रा.तांबरी विभाग, उस्मानाबाद 2) फुलचंद ललित फंड, वय 32 वर्ष, रा.बार्शी नाका, उस्मानाबाद यांनी 5,000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद च्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | 1) अमोल हनुमंतराव सुर्यवंशी, वय 34 वर्ष, रा.तांबरी विभाग, उस्मानाबाद 2) फुलचंद ललित फंड, वय 32 वर्ष, रा.बार्शी नाका, उस्मानाबाद (दोघे खाजगी ईसम) |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.12.11.2020 रोजी मराठी कन्या शाळेसमोर साई लॉन्ड्रीमध्ये शिक्षक कॉलनी उस्मानाबाद |
| तपासी अधिकारी | श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद |
| लाचेची रक्कम मागणी | 10,000/- रु लाचेची मागणी केली व 5,000/- रु लाच रक्कम स्विकारली. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांना नवीन एक वर्षासाठी नियुक्ती आदेश (ऑर्डर ) मिळवून देण्यासाठी |

यातील तक्रारदार हे महावितरणमध्ये ऑक्टोबर/2015 पासुन कंत्राटी यंत्रचालक (ऑपरेटर) म्हणुन काम करीत असुन ते 33/11 के.व्ही.उपकेंद्र होळी ता.लोहारा, जि.उस्मानाबाद येथे कंत्राटी यंत्रचालक (ऑपरेटर) म्हणुन नेमणुकीस होते.त्यांचा कालावधी संपल्याने त्यांना दि.15.10.2020 रोजी कामावरुन कमी करण्यात आले होते.

महावितरणमध्ये वर्षातून किमान दोनवेळा गुत्तेदार बदलले जातात व त्यांच्या मार्फत कंत्राटी कर्मचाऱ्यांची सहा महिन्यासाठी नियुक्ती केली जाते. दि.19.10.2020 रोजी मे.डी.एम.दहिफळे, परळी, जि.बीड यांचे नावे नवीन एक वर्षाचे कंत्राट निघालेले आहे. त्यांचे वतीने महावितरणमध्ये कंत्राटी कर्मचाऱ्याची सहा महिन्यासाठी नियुक्ती केली जात आहे. मे.डी.एम.दहिफळे यांनी अ.क्र.1 सुर्यवंशी यांना त्यांचा प्रतिनिधी म्हणुन नेमले असुन ते मे.डी.एम.दहिफळे यांचे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियुक्तीचे काम पहात आहेत.

तक्रारदार यांचा दि.15.10.2020 रोजी कालावधी संपलेला होता व त्यांना नवीन एक वर्षासाठी नियुक्तीचे आदेश (ऑर्डर) आवश्यक होते. त्यासाठी ते आज दि.12.11.2020 रोजी मे.डी.एम.दहिफळे यांचे प्रतिनिधी अं.क्र.1 सुर्यवंशी यांना भेटुन त्यांचे नियुक्तीचे आदेश (ऑर्डर) बाबत बोलले असता श्री. सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांना 10,000/- रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना सुर्यवंशी यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.12.11.2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस निरीक्षक श्री.गौरीशंकर पाबळे यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने सुर्यवंशी यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे वरील नमुद कामासाठी दि.12.11.2020 रोजी पंचासमक्ष 10,000/-रुपये लाचेची मागणी करुन आज रोजी लागलीच 5000/- रु लाच रक्कम व पहिला पगार झाल्यानंतर 5000/- रु लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे दि.12.11.2020 रोजी सापळा आयोजीत केला असता अमोल हनुमंतराव सुर्यवंशी, वय 34 वर्ष, रा.तांबरी विभाग, उस्मानाबाद यांनी मराठी कन्या शाळेसमोर साई लॉन्ड्रीमध्ये शिक्षक कॉलनी उस्मानाबाद येथे 2) फुलचंद ललित फंड, वय 32 वर्ष, रा.बार्शी नाका, उस्मानाबाद याच्या मार्फत तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्या मागणीप्रमाणे 5,000/- रुपये लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे आनंद नगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ.राहुल खाडे, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद व श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक यांनी केली असुन सदर कारवाईस पोना/जाधव, मारकड, पोकॉ/बेळे, डोके, तावसकर, आचार्य यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दुरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

**1)** मा.डॉ.राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8888807299

**2)** श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100

**3) टोल फ्री क्र. 1064**, दूरध्वनी क्र.- 02472-222879

**E-Mail ID:-** dysposmanabad@gmail.com

(प्रशांत संपते)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन,ब्युरो,उस्मानाबाद